11-04-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 04/10/2025 10:17 PM Page 1



## निवडक

### काराशीरमळ येथील हनुमान मंदिराच्या वर्धापनदिनानिमित्त आजपासून कार्यक्रम



■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. १० :** काराशीरमळ, आगोंद येथे उद्या शुक्रवार दि. ११ रोजी वर्धापन दिवस साजरा होत आहे. यानिमित्ताने सकाळी ९ वाजता धार्मिक विधीना सुरुवात होईल. सकाळी १०.३० वाजता गणहोम तर दुपारी १२ वा.आरती, तीर्थ-प्रसाद व नंतर महाप्रसाद होईल.
रात्री ९ वा. कला चेतना वळवय राजदीप नाईक निर्मित आणि श्रीनिका क्रीयेशन नागेशी, बांदोडा प्रस्तुत दोन अंकी कोकणी नाटक डायरेक्ट चंद्रार सादर केले जाईल. शनिवार दि.१२ एप्रिल रोजी, हनुमान जन्मोत्सव होईल. सकाळी ८वा, धार्मिक विधी सुरू होईल. ८.३० वाजता हनुमान मूर्ती पाळण्याचा कार्यक्रम होईल. दुपारी १ वाजता आरत्या, तीर्थ प्रसाद व नंतर महाप्रसाद होईल. संध्याकाळी ६ वाजता श्री साई महिला भजनी मंडळ आसगाव, यांचा कार्यक्रम होईल. रात्री ९ वाजता सत्यवान नाईक यांचा ओमकार मेलोडीज ओरकेस्ट्रा सादर केला जाईल. तसेच हनुमान मंदिर समितीचा देणगी कुपन्सचा निकाल होईल, असे देवस्थान समितीतर्फे कळविण्यात आले आहे. भाविकांनी या दोन्ही दिवस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन देवस्थान समितीतर्फे केले आहे.

---

### कुडणे येथील सातेरी मंदिराचा १३ रोजी वर्धापनदिन



■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. १० :** कुडणे सांखळी येथील श्री देव कुडणेश्वर देवस्थान पंचायतनातील श्री.देवी सातेरी मंदिराचा पूनप्रतिस्थापना २२ वा वर्धानदिन रविवार दि. १३ रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त सकाळी ९ वाजता सौ. व श्री. प्रशांत प्र. मळीक, सौ. व श्री. प्रमोद प्र. मळीक, सौ. व श्री. प्रसाद धा. मळीक, सौ. व श्री. रंगनाथ शा. मळीक, सौ. व श्री. प्रशांत पु. मळीक यांच्या यजमानपदी श्रींस अभिषेक, सकाळी १० वाजल्यपासून हवन युक्त नवचंडी होईल. दूपारी १ वाजता सार्वजनिक गाऱ्हाणे, नंतर आरती, तीर्थप्रसाद व महानैवेद्य होईल. संध्याकाळी ५ वाजता स्थानिक कलाकार भजन सादर करतील व त्यानंतर ७ वाजता कालेली माणगाव येथील ओंकार नटेश्वर दशावतारी नाट्य मंडळ 'देवी कुष्मांडा' हा नाट्यप्रयोग सादर करतील. सदर प्रयोग उदय शिवराम मळीक व मंगेश मळीक यांनी पुरस्कृत केला आहे. भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महानैवेद्य व त्यांच्या इतर कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

### मांद्रे येथे उद्या 'इश्चा परा ताच येता घरा'

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १० :** मधला माज येथील श्री हनुमान देवस्थानच्या चौथ्या वर्धापनदिन निम्मित शनिवार दि. १२ रोजी रात्री १० वाजता नरेंद्र मधुकर नाईक लिखित व श्री हनुमान बाल नाट्य मंडळातर्फे 'इच्छा परा ताच येता घरा' नाटक मांद्रे श्री हनुमान मंदिरात होणार आहे. या नाटकाचे दिग्दर्शन ज्ञानेश्वर पार्सेकर, सहाय्यक समीक्षा पेडणेकर व कलाकार सेजल कलशावकर, उत्कर्षा पेडणेकर, समीर पेडणेकर, शांताराम कलाशावकर, कौशिक नाईक, कृतेश आजगावकर, सांनवी नागवेकर, आर्यन वराडकर, मधुकर मांद्रेकर, चैतन्य हडफडकर, शुभम पोखरे यांच्या भुमिका आहेत. तत्पूर्वी सकाळी ५ वाजता श्री हनुमान जन्मोत्सव यजमान रेश्मा पोखरे, त्यानंतर भविकातर्फे दिंडी कार्यक्रम होणार आहे. सकाळी ८ वाजता सामूहिक अभिषेक, त्यासाठी आयोजकक्षी संपर्क साधावा. दुपारी १ वाजता आरती, तीर्थप्रसाद, महानैवेद्य होईल. संध्याकाळी ६ वाजता स्वरगणेश भक्ती व भावगीतांचा कार्यक्रम होईल. कार्यक्रमात सांरेगम प फेम व इंडियन आयडॉल फेम गणेश मेस्त्री (मुंबई) व अर्चना कामुलकर (गोवा) याचे गायन त्यांना साथसंगत समीर पेडणेकर (हार्मोनियम) बुद्धेश तळकर, उद्देश पेडणेकर ऑर्गन व ध्वनी सतीश चोडणकर यांची आहे. सदर कार्यक्रम रमेश परशुराम पोखरे व कुटुंबीय यांनी पुरस्कृत केला आहे. तरी भाविकांनी उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

# २०२८ च्या ऑलिंपिकमध्ये ६-६ पुरुष-महिला क्रिकेट संघ

## सामने टी-२० स्वरूपात खेळवले जातील | प्रत्येक संघात १५-१५ खेळाडू असतील

**नवी दिल्ली, दि. १० :**



ऑलिम्पिक २०२८ मध्ये क्रिकेटचा अधिकृत समावेश करण्यात आला असून ही घोषणा मुंबईत पार पडलेल्या खजउ च्या १४१ व्या अधिवेशनात झाली. २०२८ च्या लॉस एंजल्स ऑलिम्पिकपासून क्रिकेटचा समावेश केला जाणार आहे. आता याबाबत एक महत्वाची अपडेट समोर आली आहे.

आयसीसी क्रमवारीतील टॉपच्या सहा संघांना सहभागी होता येणार आहे. ऑलिम्पिकमध्ये टी-२० फॉरमॅटमध्ये क्रिकेटचे सामने होईल. ऑलिम्पिकमध्ये महिला आणि पुरुष अशा दोन वर्गात क्रिकेटचे सामने खेळवले जाईल. प्रत्येक संघात १५ खेळाडूंचा समावेश असणार आहे. १२८ वर्षांनंतर ऑलिम्पिकमध्ये पुन्हा क्रिकेट खेळले जाणार आहे.

ऑलिम्पिकमध्ये फक्त ६ संघांना सहभाग घेता येणार-


आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीने २०२८ च्या ऑलिम्पिकमध्ये क्रिकेटसाठी नियम बनवले आहेत. या स्पर्धेसाठी एकूण ९० खेळाडूंना तयार करण्यात आले आहे. अशा परिस्थितीत, ऑलिम्पिकमध्ये फक्त ६ संघ सहभागी होऊ शकतील, ज्यामध्ये प्रत्येक संघाच्या संघात १५ खेळाडू ठेवले जातील. पात्रता प्रक्रियेबद्दल अद्याप कोणताही खुलासा झालेला नाही, परंतु यजमान म्हणून युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका (यूएसए) ला थेट प्रवेश मिळण्याची शक्यता आहे. जर अमेरिकेला २०२८ च्या ऑलिम्पिक क्रिकेट स्पर्धेत थेट प्रवेश मिळाला तर पात्रतेसाठी फक्त ५ जागा रिक्त राहतील. जर संघ रँकिंगच्या आधारे पात्र ठरले तर सध्या भारत, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, न्यूझीलंड आणि वेस्ट इंडिज हे पुरुषांच्या टी-२० मध्ये जगातील टॉप-५ संघ आहेत. तर महिला टी-२० संघांच्या क्रमवारीत भारत, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका पहिल्या पाच स्थानांवर आहेत.

**ऑलिम्पिकमध्ये भारत-पाकिस्तान सामना रंगणार?**

भारत-पाकिस्तान सामना गेल्या अनेक दशकांपासून क्रिकेट जगतात उत्साह निर्माण करत आहे. अशा परिस्थितीत, भारत-पाकिस्तान सामना ऑलिम्पिकमध्ये खेळला जाईल का, असा प्रश्न लोकांच्या मनात नक्कीच निर्माण होईल. ऑलिम्पिकमधील पात्रता प्रक्रिया अद्याप जाहीर झालेली नाही, परंतु जर संघ रँकिंगच्या आधारे पात्र ठरले तर पुरुष आणि महिला क्रिकेटमध्ये ऑलिम्पिकमध्ये खेळण्याचे पाकिस्तानचे स्वप्न सध्या तरी अपूर्ण राहू शकते.

## चेन्नईच्या कर्णधारपदाची धुरा पुन्हा धोनीकडे

**चैनई, दि. १० :**



क्रिकेट विश्वातून एक मोठी बातमी समोर येत आहे. कॅप्टन कूल एम एस धोनी पुन्हा एकदा चेन्नई सुपर किंग्जचा कर्णधार बनला आहे. चेन्नईचा जखमी ऋतुराज गायकवाड आयपीएल २०२५ मधून बाहेर पडल्यामुळे फ्रेन्चायझीने पुन्हा एकादा धोनीकडे संघाचे नेतृत्व दिले आहे.

ऋतुराज गायकवाड कोपराच्या दुखापतीमुळे स्पर्धेतून बाहेर पडला आहे. त्याच्या जागी एमएस धोनी चेन्नई सुपर किंग्जचे नेतृत्व करताना दिसणार आहे. आयपीएल २०२५ हंगामाच्या मध्यभागी धोनीला पुन्हा एकदा सीएसकेची जबाबदारी स्वीकारावी लागली आहे. आयपीएल हंगामाच्या मध्यातच संघाचं नेतृत्त्व स्वीकारण्याची ही धोनीची दुसरी वेळ आहे. याआधी आयपीएल २०२२ मध्ये धोनीने रवींद्र जडेजाच्या जागी संघाची जबाबदारी स्वीकारली होती. चेन्नई सुपर किंग्जचे प्रशिक्षक स्टीफन फ्लेमिंग यांनी गुरुवारी धोनीकडे संघाचे नेतृत्त्व देत असल्याचे जाहीर केले.चेन्नई सुपर किंग्जचे मुख्य प्रशिक्षक स्टीफन फ्लेमिंग यांनी गुरूवारी ऋतुराजला स्पर्धेतून माघार घेत धोनीला कर्णधारपद सोपवल्याची अधिकृत घोषणा केली. चेन्नई सुपर किंग्ज संघाला आतापर्यंत खेळलेल्या पाच सामन्यांपैकी फक्त एकच सामना जिंकता आला आहे आणि चार सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला आहे. अशा परिस्थितीत धोनीच्या नेतृत्वाखाली आपल्याला पुन्हा एकदा काही जादू दिसेल की नाही हे येणारा काळच सांगेल. परंतु धोनीचे चाहते पुन्हा एकदा थालाला चेन्नईचे नेतृत्त्व करताना पाहू शकतील.

## व्हीएमसीएल ब्लास्टर्सची व्हीएमसीएल किंग्सवर मात

**टीम दैनिक हेराल्ड**

मडगाव, दि. १० : मडगाव क्रिकेट क्लबने मडगावच्या एमसीसी मैदानावर आयोजित फर्डिनँड कुएल्हो स्मृती व्हेटरन मेंबर्स क्रिकेट लीगच्या तिसऱ्या हंगामातील दुसऱ्या सामन्यात व्हीएमसीएल ब्लास्टर्सने अटीतटीच्या लढतीत व्हीएमसीए किंग्स संघाचा ७ धावांनी पराभव केला. बुधवारी विद्युतझोतात हा सामना झाला. ब्लास्टर्सने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित २० षटकांत ९ बाद १४४ अशी धावसंख्या उभारली. यानंतर त्यांनी किंग्सचा डाव १८.५ षटकांत १३७ धावांत संपवला.

ब्लास्टर्सने या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली. सलामीवीर बाळकृष्ण होडारकर याने ४ चौकारांसह ३० चेंडूंत ३६ धावा केल्या. तर कर्णधार व यष्टीरक्षक फलंदाज उदय नाईक याने ६ चौकारांच्या मदतीने २८ चेंडूंत ३८ धावा केल्या. याव्यतिरिक्त विराज आमोणकरने १६ धावा जमवल्या. किंग्सकडून अपूर्व भेंब्रे व योगेश नाईक यांनी प्रत्येकी २ तर विपुल कालेकरने २ गडी बाद केला.




**मडगाव : उदय नाईक यांना एमसीसी सदस्य आणि क्रिकेटपटू अमोद बोरकर यांनी सामनावीराचा पुरस्कार देऊन गौरविले.**

आव्हानात्मक लक्ष्याचा पाठलाग करताना किंग्स संघाला अपूर्व भेंब्रे याने वेगवान सलामी दिली. त्याने केवळ १५ चेंडूंत ३ चौकार व ३ षटकारांसह ३५ धावा चोपल्या. दुसरा सलामीवीर रोहित मिश्राने ३६ चेंडूंत ३१ धावा केल्या. या दोघांनी संघाला ४१ धावांची सलामी दिली. यानंतर मात्र त्यांची मधली फळी कोलमडली. आशिष दुकळे (१५), व्यंकटेश राऊत देसाई (१२), अंबे पर्वतकर (११) यांचे प्रयत्न अपुरे पडले. ब्लास्टर्स संघाकडून उदय नाईक, विनोद सोळंकी व विराज आमोणकर यांनी प्रत्येकी २० धावांत २, बाळकृष्ण होडारकरने २५ धावांत २ तर श्रीरामने १ गडी बाद केला. फलंदाजीत ३८ धावा व गोलंदाजीत २ गडी बाद केलेला उदय नाईक सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

**संक्षिप्त धावफलक**

व्हीएमसीएल ब्लास्टर्स - २० षटकांत ९ बाद १४४ (उदय नाईक ३८, बाळकृष्ण होडारकर ३६, विराज आमोणकर नाबाद १६, अपूर्व भेंब्रे १७-२, योगेश नाईक ३३-२, विपुल कालेकर २६-१) विजयी वि. व्हीएमसीएल किंग्स - १८.५ षटकांत सर्वबाद १३७ (अपूर्व भेंब्रे ३५, रोहित मिश्रा ३१, आशिष दुकळे १५, विनोद सोळंकी २०-२, उदय नाईक २०-२, विराज आमोणकर २०-२, बाळकृष्ण होडारकर २५-२, श्रीराम ११-१).




RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २१८ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 218 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .